**CNR NO. MHPU13-000039-2016**

**रे.दि.मु.नं. १९/२०१६**

## निशाणी ४३ खालील आदेश

(श्री. अहमद समशेरभाई मुल्लानी वि. श्री. बबन गजानन खोमणे)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. सदरील वादींनी प्रस्तुतचा दावा साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळण्यासाठी व निरंतरचे ताकिदीकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन आहे की, दावा मिळकत ही सन १९४९ पासून वादीचे पूर्वजांच्या ताब्यात होती व त्यानंतर वादी यांच्या ताब्यात आहे. वादीचा ताबा आजतागायत प्रतिवादी यांनी काढून घेतलेला नाही. एखादी व्यक्ती १२ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी एखादी मिळकत ताब्यात असेल तर ती विरोधी हक्काने मालक होते. वादी देखिल त्याप्रमाणे दावा मिळकतीचे मालक झाले आहेत. त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे व त्याबाबत वादीस विकल्पे करुन ठरावासाठी मागणी करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असून त्यामध्ये दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादीतर्फे म्हणणे सदरच्या अर्जावर देवून अर्जातील कथन अमान्य व नाकबुल केले आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार प्रस्तुतचा दावा करारपुर्तीचा नाही. वादीच्या अर्जामधील कथनावरुन वादी हे विरोधी हक्काने मालक झाल्याचे कथन करतात. वादी हे वेगळी केस मांडू शकत नाही. प्रतिवादी हे वेगळा बचाव घेवू शकतात परंतु वादी त्यांचे कथन बदलू शकत नाहीत. प्रस्तावीत दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. वादीचा अर्ज चालण्यास पात्र नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळण्यासाठी व निरंतरचे ताकिदीकरीता आहे. अर्जातील कथनावरुन असे दिसून येते की, वादीच्या कथनानुसार वादी १२ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी दावा मिळकत कब्जामध्ये आहेत. त्यामुळे त्यांना त्याबाबत मागणी करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा

करारपूर्तीचा आहे ही बाब वादीच्या दाव्यातील कथनावरुन स्पष्ट दिसून येते परंतु वादीची प्रस्तुतची मागणी वैकल्पीक आहे. दाव्याचे स्वरुप पाहता दोन्ही पक्षकारांना पूर्ण संधी देणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही दावा मिळकतीं संदर्भात आहे. दावा मिळकतीमध्ये वादीस हक्क आहे किंवा कसे हे पुराव्याअंती सिध्द होणार आहे. परंतु सद्यपरिस्थीतीमध्ये दावा मिळकतीमधील दोन्ही पक्षकाराचे हितसंबंध विचारात घेता सदर दुरूस्तीने वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद कायमस्वरूपी मिटणार आहे. सदर दुरुस्तीने दाव्याचे स्वरूप व वादीने केलेली मागणी पाहता वादीचा अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे स्वरूप बदलणार नाही. सदरची दुरुस्ती ही दावा मिळकतीशी संलग्न व संबंधीत आहे. वादीचा अर्ज नामंजूर केल्यास प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे व पुन्हा दाव्यांची साखळी वाढणार आहे. दावा मिळकतीविषयी वादीच्या असलेल्या मागण्याचा गुणदोषावर अंतिम निकाल होण्याकरीता वादीने केलेली मागणी मान्य करणे योग्य होणार आहे. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. अर्ज मंजूर केल्यास दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेस मदत होणार आहे. वादीने अर्ज दाखल करण्यास विलंब का झाला किंवा दाव्या सोबत सदरची मागणी का नमूद केली नाही याचे कारण अर्जामध्ये नमूद केलेले नाही. त्यामुळे वादीने अर्ज दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा खर्च वादीवर ठेवणे योग्य व न्याय आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा अर्ज (नि.४३) वादीने प्रतिवादी यांना अर्जाचा खर्च रक्कम रुपये १,०००/- एवढा पुढील तारखेपर्यत देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जामध्ये मागणी केलेली दावा दुरूस्ती करून दावा दुरुस्ती प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

सही/-

(सौ. एस. के. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सासवड.

सासवड.
दिनांक: २२/०७/२०२५.